# ग्रामीण कृषी मौसम सेवा

भारत मौसम विभाग

प्रायोगिक ब्लॉक लेव्हल ॲग्रोमेट ॲडव्हायझरी बुलेटिन

(आयएमडी आणि आयसीएआर चा संयुक्त उपक्रम)

## हवामानावर आधारीत कृषि सल्ला

दिनांक : 16-09-2022

नागपूर(महाराष्ट्र) मध्ये कामठी ब्लॉक करा साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2022-09-16 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)

| हवामान घटक | 2022-09-17 | 2022-09-18 | 2022-09-19 | 2022-09-20 | 2022-09-21 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 5.2 | 1.1 | 5.6 | 16.0 | 13.0 |
| कमाल तापमान (अं.से) | 29.9 | 30.3 | 30.7 | 31.1 | 31.7 |
| किमान तापमान (अं.से) | 22.8 | 22.5 | 22.3 | 22.8 | 23.0 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 90 | 79 | 85 | 81 | 86 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 82 | 73 | 77 | 75 | 80 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 7.0 | 8.0 | 7.0 | 7.0 | 8.0 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 265 | 287 | 310 | 300 | 315 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 7 | 7 | 7 | 7 | 6 |

### हवामान सारांश / चेतावणी:

• कामठी तालुक्यामध्ये, भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या तालुकास्तरीय मूल्य वर्धित अंदाजानुसार, पुढील पाच दिवस दिनांक१७ सप्टेंबर ते २१ सप्टेंबर २०२२ दरम्यान आकाश आंशिक ते मुख्यतः ढगाळ राहण्याची अधिक शक्यता, • पुढील पाच दिवस तालुक्यात हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची अधिक शक्यता वर्तविण्यात आली आहे. • दिनांक १७, १८, १९, २० व २१ सप्टेंबर २०२२ रोजी तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची अधिक शक्यता वर्तविण्यात आली आहे. • विस्तारित स्वरूपाच्या अंदाज प्रणालीनुसार विदर्भ उपविभागामध्येदिनांक २१ते २७ सप्टेंबर २०२२ दरम्यान सरासरीपेक्षा जास्त पाऊस होण्याची शक्यता तर कमाल व किमान तापमान सरासरी एवढे राहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. • अंदाजाची वैधता- नमूद तारखेच्या सकाळी ०८:३० वाजेपर्यंत.

### कृषि सल्ला:

• कृषी रसायनांची फवारणीव आंतरमशागतीची कामेपुढील २ दिवसामध्ये स्थानिक स्वच्छ हवामान परिस्थितीत बघून करावी त्या नंतर पावसाचा अंदाज लक्षात घेता पुढे ढकलावी. • काढणी केलेल्या शेतमाल प्लास्टिक शीट च्या सहाय्याने झाकून ठेवावा तसेच सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. • फळबागा, हंगामी पिके व भाजीपाला पिकाच्या शेतामध्ये पावसाचे पाणी साचून असल्यास अतिरिक्त पाण्याचा तत्काळ निचरा करावा. • विजांचा कडकडाट होण्याची शक्यता लक्षात घेता गाय, म्हैस, शेळ्या, मेंढ्याव इतर पाळीव जनावरे मोकळ्या जागेत चरावयास सोडण्याचे टाळावे. जनावरे हे खुल्या पाण्याचे स्त्रोत, नदी किंवा तलाव व ट्रक्टर व इतरधातूच्या अवजारांपासून दूर ठेवावे. • स्थानिक हवामान अंदाज व सूचना यांचा अंदाज घेऊनच शेती कामाचे नियोजन करावे. पाऊस व मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता लक्षात घेता, शेतकरी व शेतमजूर यांनी सुरक्षित ठिकाणी आसरा घ्यावा. • शेतातील अति महत्वाची कामे शक्यतो सकाळच्या वेळी उरकून घेण्याला प्राधान्य द्यावे.शेतमजुरांना शेतामध्ये एकत्रित समूहाने काम करू न देता दोन व्यक्तीमध्ये जास्तीत जास्त अंतर ठेवावे. • शेतात आसरा घेताना पाण्याचे स्त्रोत (विहीर, तलाव, नदी इत्यादी), उंच ठिकाणे (झाडे, उंचवटे), धातूचे अवजारे या पासून जास्तीत जास्त अंतरावर आसरा घ्यावा.शेतकरी व शेतमजूर यांनी झाडाखाली आसरा घेणे टाळावे तसेच जनावरांचा झाडाखाली आश्रय टाळावा.

### संक्षिप्त संदेश सल्ला:

| |
|---|
| • कृषी रसायनांची फवारणीव आंतरमशागतीची कामेपुढील २ दिवसामध्ये स्थानिक स्वच्छ हवामान परिस्थितीत बघून करावी त्या नंतर पावसाचा अंदाज लक्षात घेता पुढे ढकलावी. |

## पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| कपाशी | • पावसाचे पाणी पिक क्षेत्रात साचून असल्यास अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. • कृषी रसायनांची फवारणीव आंतरमशागतीची कामेपुढील २ दिवसामध्ये स्थानिक स्वच्छ हवामान परिस्थितीत बघून करावी त्या नंतर पावसाचा अंदाज लक्षात घेता पुढे ढकलावी. • कपाशीमध्ये रस शोषक किडीच्या प्रादुर्भावाकडे लक्ष द्यावे, रस शोषक किडीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीपेक्षा जास्त दिसून आल्यास, नियंत्रणासाठी फ्लॉनिकॅमिड ५० डब्ल्यूजी @ ८० ग्रॅम प्रती एकर किंवा डायनोटेफ्युरोन २० एसजी @ ६० ग्रॅम प्रती एकर किंवा थायमेथॉक्झाम २५ डब्ल्यूजी @ ४० ग्रॅम/एकर प्रमाणात किटकनाशकाची स्वच्छ हवामान असताना व वाफसा परिस्थितीत असताना करावी. • गुलाबी बोंडअळीचे निरीक्षण करण्यासाठी, शेतात २कामगंध सापळे प्रती एकर लावावे. ज्या ठिकाणी कामगंध सापळ्यामध्ये सलग ३ रात्री ६ ते ८ पतंग आढळून आल्यास किंवा १० टक्के डोमकळ्या किंवा प्रादुर्भाव ग्रस्त हिरवी बोंडे आढळून आल्यास किंवा प्रोफेनोफॉस ५० % ईसी ६०० मिली प्रती एकर किंवा इंडोक्साकार्ब १४.५ एससी २०० मिली प्रती एकर किंवा इमामेक्टीन बेन्झोएट ५ % एसजी १०० ग्राम प्रती एकर किंवा क्लोरपायरीफॉस ५० ईसी ५०० मिली प्रती एकर या प्रमाणात गुलाबी बोंड अळीच्या नियंत्रणासाठी फवारणी करावी. गुलाबी बोंड अळी व्यवस्थापनासाठी ट्रायकोग्रामा अंडी १.५ लाख प्रती हेक्टर या प्रमाणात वापर करावा. • कपाशीमध्ये पावसामुळे आकस्मिक मर ची लक्षणे दिसून आल्यास, कॉपरऑक्सिक्लोराईड ५० डब्ल्यूपी २५ ग्राम + १५० ग्राम युरिया प्रती १० लिटर पाण्यात मिसळून आळवणी (ड्रेंचींग) करावी. • कपाशीवरील पानावरील ठिपके, बोंड सड व करपा या बुरशीजन्य रोगाच्या व्यवस्थापनासाठी क्रेसॉक्सिम-मिथाइल ४४.३ एसस १० मिली किंवा प्रोपिनेब ७० डब्ल्यूपी२५ ग्राम किंवा प्रोपिकोनाझोल २५ ईसी१० मिली किंवा मेटीराम ५५% + पायराक्लोस्ट्रोबिन ५ % डब्लूजी २० ग्रॅम किंवा अझॉक्सिस्ट्रोबिन १८.२ % डब्ल्यू/डब्ल्यू + डायफेनोकोनाझोल ११.४ % डब्ल्यू/डब्ल्यू एससी१० मिली किंवा फ्ल्यूक्सापायरोक्सॅड १६७ g/l + पायराक्लोस्ट्रोबिन ३३३ g/l एससी ६ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून स्वच्छ हवामान परिस्थिती असताना फवारणी करावी. |
| कपाशी | • कपाशी मधील नैसर्गिक पाते व फुलगळ टाळण्यासाठी एनएए (नॅप्थेलिक ॲसिटिक ॲसिड)४ मिली प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी तसेच कपाशी अतिरिक्त कायिक वाढ रोखण्यासाठी क्लोरमेक्वेट क्लोराईड ५० % एसएल १-२ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून स्वच्छ हवामान परिस्थिती असताना फवारणी करावी. |
| सोयाबीन | • पावसाचे पाणी पिक क्षेत्रात साचून असल्यास अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. • कृषी रसायनांची फवारणीव आंतरमशागतीची कामेपुढील २ दिवसामध्ये स्थानिक स्वच्छ हवामान परिस्थितीत बघून करावी त्या नंतर पावसाचा अंदाज लक्षात घेता पुढे ढकलावी. • सोयाबीन पिकामध्ये पिवळ्या मोझेक या रोगाच्या व्यवस्थापनासाठी शेतातील प्रादुर्भाव ग्रस्त झाडे उपटून नष्ट करावी तसेच पूर्व मिश्रित कीटकनाशक, थायमेथोक्झाम १२.६ % + लॅम्बडा सायहॅलोथ्रिन ९.५ % झेडसी १२५ मिली प्रती हेक्टर किंवा बीटा-सायफ्ल्यूथ्रीन ८.४९ % + इमिडाक्लोप्रिड १९.८१ % ओडी ३५० मिली प्रती हेक्टर ५०० लिटर पाणी या प्रमाणात मिसळून स्वच्छ हवामान परिस्थिती असताना फवारणी करावी. या फवारणी द्वारे खोड माशी या किडीचे सुद्धा नियंत्रण होते, पिवळा मोझेक या विषाणू जन्य रोगाच्या प्रसारास कारणीभूत पांढरी माशी या किडीला आकर्षित करण्यासाठी ठीक ठिकाणी पिवळे चिकट सापळे लावावेत. शेतकरी बांधवांनी अळ्या खाणाऱ्या शिकारी पक्ष्यांना थांबण्यासाठी सोयाबीन शेतात विविध ठिकाणी ‘ T ’ आकाराचे पक्षीथांबे उभारावेत. • सोयाबीन पिकामध्ये तंबाखूची पाने खाणारी अळी व शेंगा पोखरणाऱ्या अळीच्या व्यवस्थापनासाठी कीड निहाय कामगंध सापळे लावावे. या सापळ्यांमध्ये ५ ते १० प्रौढ पतंग आढळल्यास, पिकामध्ये या किडीच्या प्रादुर्भावाची प्रारंभिक अवस्था दर्शवते • सोयाबीन पिकामध्ये खोड माशी, चक्रीभुंगा व पाने खाणाऱ्या अळ्यांच्या एकत्रित व्यवस्थापनासाठी क्लोरॅंट्रानिलिप्रोल ०९.३० % + लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ०४.६० % झेडसी (२०० मिली मिली/हेक्टर) किंवा थायमेथोक्झाम १२.६ टक्के + लॅम्बडा सायहॅलोथ्रिन ९.५ % झेडसी १२५ मिली प्रती हेक्टर किंवा बीटा- सायफ्ल्यूथ्रीन ८.४९ % + इमिडाक्लोप्रिड १९.८१ % ओडी ३५० मिली प्रती हेक्टर या प्रमाणात स्वच्छ हवामान परिथिती असताना फवारणी करावी. |

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| सोयाबीन | • पावसाचे पाणी पिक क्षेत्रात साचून असल्यास अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. • कृषी रसायनांची फवारणीव आंतरमशागतीची कामेपुढील २ दिवसामध्ये स्थानिक स्वच्छ हवामान परिस्थितीत बघून करावी त्या नंतर पावसाचा अंदाज लक्षात घेता पुढे ढकलावी. • सोयाबीन पिकामध्ये उंटअळी, तंबाखूची पाने खाणारी अळी व शेंगा पोखरणाऱ्या अळीच्या व्यवस्थापनासाठी ब्रोफ्लानिलाइड ३०० g/l एससी (४२ ते ६२ ग्राम प्रती हेक्टर) किंवाफ्लुबेन्डियामाइड ३९.३५ % w/w एससी(१५० मिली प्रती हेक्टर) किंवाइंडोक्साकार्ब १५.८० %ईसी (३३३ मिली प्रती हेक्टर)किंवाटेट्रानिलीप्रोल 18.18 एससी (२५० ते ३०० मिली प्रती हेक्टर) किंवानोव्हॅल्युरॉन ०५.२५ % + इंडॉक्साकार्ब ०४.५० % एससी(८२५ ते ८७५ मिली प्रती हेक्टर)किंवा क्लोरॉंट्रानिलिप्रोल १८.५ % एससी (१५० मिली प्रती हेक्टर) किंवाईमामेक्टिन बेंझोएट ०१.९० % ईसी (४२५ मिली/हेक्टर) किंवाफ्लुबेन्डियामाइड २० %डब्ल्यूजी (२५० ते ३०० ग्राम प्रती हेक्टर)किंवा लॅम्बडा- सायहॅलोथ्रीन ०४.९० %सीएस (३०० मिली/हेक्टर) किंवाप्रोफेनोफोस ५० %ईसी (१ लिटर प्रती हेक्टर) किंवास्पिनेटोरम ११.७० % एससी (४५० मिली प्रती हेक्टर) किंवापूर्व-मिश्रित किटक नाशक बीटा-सायफ्लुथ्रिन ०८.४९ % + इमिडाक्लोप्रिड १९.८१ % w/w ओडी (३५० मिली प्रती हेक्टर) किंवाथायामेथोक्सम १२.६० % + लॅम्बडा-सायहॅलोथ्रीन ०९.५०% झेडसी (१२५ मिली/हेक्टर) किंवाक्लोरॉंट्रानिलिप्रोल ०९.३० % + लॅम्बडा-सायहॅलोथ्रीन ०४.६० % झेडसी (२०० मिली प्रती हेक्टर) या प्रमाणातवरीलपैकी कोणत्याही एक कीटकनाशकाची स्वच्छ हवामान परिस्थिती असताना करावी. |
| सोयाबीन | • पावसाचे पाणी पिक क्षेत्रात साचून असल्यास अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. • कृषी रसायनांची फवारणीव आंतरमशागतीची कामेपुढील २ दिवसामध्ये स्थानिक स्वच्छ हवामान परिस्थितीत बघून करावी त्या नंतर पावसाचा अंदाज लक्षात घेता पुढे ढकलावी. • सोयाबीन पिकामध्ये फक्त चक्रीभुंगा किडीच्या नियंत्रणासाठी किडीने प्रादुर्भाव ग्रस्त झाडे उपटून नष्ट करावी तसेच लक्षणे दिसू लागताच टेट्रानिलीप्रोल १८.१८ एससी (२५० ते ३०० मिली प्रती हेक्टर) किंवा थायक्लोप्रिड २१.७ एस.सी. (७५० मिली प्रती हेक्टर) किंवा प्रोफेनोफॉस ५० ई.सी. १ लिटर प्रती हेक्टर) किंवा इमामेक्टीन बेन्झोएट ०१.९० ईसी (४२५ मिली प्रती हेक्टर) या प्रमाणात फवारणी करावी. • सावधगिरीचा उपाय म्हणून, शेतकरी खालीलपैकी कोणत्याही एका शिफारस केलेल्या बुरशीनाशकाची फवारणी करू शकतात ज्यामुळे बियाण्याची गुणवत्ता देखील सुधारू शकते. यामध्ये टेबुकोनाझोल २५.९ % ईसी (६२५ मिली प्रती हेक्टर) किंवा टेब्युकोनाझोल + सल्फर (१२५० ग्राम प्रती हेक्टर) किंवा पायराक्लोस्ट्रोबिन २० % w/w डब्ल्यूजी (३७५ ते ५०० ग्राम प्रती हेक्टर) किंवा पायराक्लोस्ट्रोबिन १३.३ g/l + ईपॉक्सिकोनॅझोल ५० g/l एसई (१७५० मिली प्रती हेक्टर) किंवा फ्ल्यूक्सापायरोक्सॅड १६७ g/l + पायराक्लोस्ट्रोबिन ३३३ g/l एससी (३०० मिली/हे) किंवा पायराक्लोस्ट्रोबिन १३३ g/l + ईपॉक्सिकोनॅझोल ५० g/l एसई (७५० मिली प्रती हेक्टर) या बुरशीनाशकाचा वापर करू शकतात. |
| भात | • कृषी रसायनांची फवारणीव आंतरमशागतीची कामेपुढील २ दिवसामध्ये स्थानिक स्वच्छ हवामान परिस्थितीत बघून करावी त्या नंतर पावसाचा अंदाज लक्षात घेता पुढे ढकलावी. • धान पिकातील खोडकिडा व गादमाशी या किडीने आर्थिक नुकसान पातळी गाठली असल्यास व्यवस्थापनासाठी कार्बोफ्युरॉन ३ % दानेदार किंवा फिप्रोनिल ०.३ टक्के दानेदार @ २५ किलोग्रॅम प्रती हेक्टरी बांधीमध्ये ७ ते १० सेमी. पाणी, असतांना वापरावे. बांधीमधील पाणी ४ ते ५ दिवस बांधीबाहेर काढू नये. आवश्यकतेनुसार ही किटकनाशके ३० दिवसांनी परत वापरावीत.१०० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व ५० किलो पालाश प्रति हेक्टरी द्यावे. संपूर्ण स्फुरद व पालाश आणि नत्राची अर्धी मात्रा चिखलावर तर उरलेली नत्राची अर्धी मात्रा दोन समान हप्त्यात (फुटवे फुटण्याच्या वेळी साधारणपणे ३० दिवसांनी आणि लोंबी येण्याच्या सुरुवातीस साधारणपणे ६० दिवसांनी) विभागून द्यावी.करपा रोगाच्या व्यवस्थापनासाठी हेक्झाकोनॅझोल ५ % ई.सी. @ २० मि.ली. किंवा आयसोप्रोथिलेन ४० % ई.सी. @ १५ मि.ली. किंवा टेबूकोनॅझोल २५.९ ई.सी. @ १५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून स्वच्छ हवामान परिस्थिती असताना फवारणी करावी. |
| तूर | • पावसाचे पाणी पिक क्षेत्रात साचून असल्यास अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. • कृषी रसायनांची फवारणीव आंतरमशागतीची कामेपुढील २ दिवसामध्ये स्थानिक स्वच्छ हवामान परिस्थितीत बघून करावी त्या नंतर पावसाचा अंदाज लक्षात घेता पुढे ढकलावी. |

**फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:**

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| वांगे | • पावसाचे पाणी पिक क्षेत्रात साचून असल्यास अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. • कृषी रसायनांची फवारणीव आंतरमशागतीची कामेपुढील २ दिवसामध्ये स्थानिक स्वच्छ हवामान परिस्थितीत बघून करावी त्या नंतर पावसाचा अंदाज लक्षात घेता पुढे ढकलावी. • मागील आठवड्यातील पाऊस, उच्च आर्द्रता आणि ढगाळ हवामानामुळे, वांग्याच्या पिकावर फळे व शेंडा पोखरणाऱ्या अळीचा रादुर्भाव दिसून आल्यास व आर्थिक नुकसान पातळी गाठत असल्यास खालीलपैकी कोणत्याही कीटकनाशकाची फवारणी करावी, • कार्बोसल्फान २५ % ईसी १२५० मिली प्रति हेक्टर किंवाडेल्टामेथ्रिन ०२.८० % ईसी ४०० ते ५०० मिली प्रति हेक्टर किंवाइमामेक्टिन बेंझोएट ०५ % एसजी २०० ग्रॅम प्रति हेक्टर किंवालॅम्बडा-सायहॅलोथ्रीन ०४.९० % सीएस ३०० मिली प्रति हेक्टर किंवास्पिनोसॅड ४५ % एससी १६२ ते १८७ मिली प्रति हेक्टर किंवाथियाक्लोप्रिड २१.७० % एससी ७५० मिली प्रति हेक्टर किंवाक्लोरॅंट्रानिलिप्रोल ०९.३० % + लॅम्बडा-सायहॅलोथ्रीन ०४.६० % झेडसी २०० मिली प्रति हेक्टर या प्रमाणात ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| टोमॅटो | • पावसाचे पाणी पिक क्षेत्रात साचून असल्यास अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. |
| संत्रा | • पावसाचे पाणी पिक क्षेत्रात साचून असल्यास अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. • कृषी रसायनांची फवारणीव आंतरमशागतीची कामेपुढील २ दिवसामध्ये स्थानिक स्वच्छ हवामान परिस्थितीत बघून करावी त्या नंतर पावसाचा अंदाज लक्षात घेता पुढे ढकलावी. • फळातील रस शोषणारे पतंगया किडीचा प्रादुर्भाव आंबीया हंगामात फळ पिकण्याच्या अवस्थेमध्ये ऑगस्टते नोव्हेंबर या काळात दिसून येतो. • रासायनिक उपाय:-पतंगांना आकर्षित करून मारण्यासाठी मॅलाथिऑन ५० इ.सी. १० मि.ली. + १०० ग्रॅमगुळ + १०० मि.ली. + संत्रा फळांचा रस ९०० मि.ली. पाण्यामध्ये मिसळून विषारीआमिष (बेट) तयार करावे आणि रूंद तोंडाच्या बाटल्या भरून २५ ते ३० झाडांसाठीदोन याप्रमाणे बाटल्या झाडांच्या फांद्याना बांधाव्यात. |

## पशुधन विषयक निहाय सल्ला:

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| म्हैस | • विजांचा कडकडाट होण्याची शक्यता लक्षात घेता गाय, म्हैस, शेळ्या, मेंढ्याव इतर पाळीव जनावरे मोकळ्या जागेत चरावयास सोडण्याचे टाळावे. जनावरे हे खुल्या पाण्याचे स्त्रोत, नदी किंवा तलाव व ट्रक्टर व इतरधातूच्या अवजारांपासून दूर ठेवावे. • गोठयातील जमीन कोरडी ठेवावी व स्वच्छता राखावी. • बुरशी लागू नये यासाठी जनवारांचे खाद्य व चारा सुरक्षित साठवावा. • जनावरांच्या गोठयाचा सभोवतालील परिसर स्वच्छ व निरोगी ठेवावा आणि गोठ्याभोवती असलेली अनावश्यक झाडे झुडुपे काढून टाकावीत. |
| गाय | • लम्पी स्क्रीन रोग हा कॅप्रीपॉक्स नावाच्या विषाणूमुळे हा रोग होतो. हा विषाणू शीपपॉक्स व गोटपॉक्स हा गटातील विषाणूसोबत संबंधित आहे. ह्या रोगाचा प्रसार हा रक्त शोधणाऱ्या कीटकांच्या चाव्यातून होतो. काही विशिष्ट जातीचे डास तसेच Culex किंवाAedes, विशिष्ठ जातीच्या गोचीड किंवा माश्या यांच्या माध्यमातून ह्या रोगाचा प्रसार होतो. • त्यामुळे बाह्य परजीवी कीटकांचा बंदोबस्त करणे आवश्यक आहे. रोगांच्या लक्षनामध्ये जनावराच्या नाक व तोंडाच्या आतील भागात गाठी, पुढील व मागील पायावर सूज, पोळीला सूज, ताप येणे व जनावराची भूक मंदावणे तसेच अंगावर गाठी येणे यांचा समावेश होतो. • जनावरांमध्ये दुय्यम प्रादुर्भाव टाळण्यासाठी पशुवैद्याकाच्या सल्ल्याने प्रतिजैविके, जीवनसत्वे इत्यादी ची लस द्यावी. • लम्पी स्क्रीन रोग व्यवस्थापनासाठी रोगबाधीत पशुधननिरोगी पशुधनापासूनविलगीकरण करावे अथवा त्यांना एकत्रित चरावयास सोडू नये. रोगबाधीत पशुधनाचीने-आण बंद करावी. तसेच साथीच्या काळात गावातुन/परिसरातुन गोठयास भेट देणा-यांची संख्या मर्यादीत करावी. • शुश्रृषा केल्यानंतर हात अल्कोहोल मिश्रीतसॅनिटायझरने धुवून टाकावेत. तसेच पादत्राने व पोषाख, गरम पाण्याने निर्जंतुक करुनघ्यावा. बाधीत पशुधनाच्या संपर्कामध्ये आलेले वाहन व परिसर तसेच इतर साहित्यनिर्जंतुक करावे. • रोगनियंत्रणासाठी रक्तपिपासू चावणा-या किटकवर्गीय माशा, डास, गोचीड यांचे निर्मुलन करावे. पशुधन व परिसरावरती रासायनिक/ वनस्पतीजन्यकिटकनाशकांची फवारणी करावी. |

## इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला:

| इतर (माती / जमीन तयार करणे) | इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला |
|---|---|
| सामान्य सल्ला | • शेतकरीबांधवांनी मेघगर्जना आणि आकाशात विजा चमकत असतांना घ्यावयाची काळजी: जर तुम्हीशेतात काम करीत असाल तर शेताजवळील ताबडतोब आश्रय घ्यावा. शेतातील सुरक्षितठिकाणाचा आसरा घेतल्यानंतर पायाखाली कोरडे लाकूड, प्लास्टिक, गोणपाट, कोरडापालापाचोळा ठेवावा. तुमचे दोन्ही पाय एकत्र करून गुडघ्यावर दोन्ही हात ठेवूनतळपायावर बसावे. तुमच्या पायाव्यतिरिक्त शरीराचा अन्य कुठलाही भाग जमिनीलास्पर्श होणार नाही याची काळजी घ्यावी. जमिनिमध्ये ओलावा असलेल्या ठिकाणीकिंवा पाण्याच्या स्त्रोतामध्ये जसे कि, तलावात काम करणाऱ्या व्यक्तींनी ताबडतोब सुरक्षित आणि कोरड्या ठिकाणी जावे.जवळपास उंच झाडे असतील तर त्या झाडाच्या उंचीपेक्षा दुप्पट उंचीच्या अंतरावरआश्रय घ्यावा. विजांच्याबचावापासून पक्के घर हे सर्वात सुरक्षित ठिकाण आहे. शेतकऱ्यांनी आपले घर तसेचजनावरांचा गोठ्याच्या आजूबाजूला शक्यतो कमी उंचीची झाडे लावावीत. ओलावा असलेले, दलदलीचे ठिकाण तथा पाण्याचे स्तोत्र (विहीर, तलाव, नदी, शेत तालाव ई.) पासूनशक्यतो दूर राहावे. चारचाकी वाहनातून प्रवास करीत असल्यास वाहनातच थांबावे.शेतकरी बांधवांनी त्यांच्याजवळ धातूचे कुठलेही उपकरण नसावे याची दक्षता घ्यावी.शेतामध्ये काम करतांना एकाच वेळी जास्त व्यक्तींनी एकत्र काम करू नये. दोनव्यक्तीमध्ये किमान १५-२० फूट अंतर राहील याची काळजी घ्यावी. धातूची दांडीअसलेल्या छत्रीचा वापर करू नका. शेतकऱ्यांनी विजेवर चालणारी तसेच धातू पासूनबनलेल्या इतर कृषी अवजारांपासून दूर रहा. |